# बोर्ड कृतिपत्रिका: जुलै 2022

## मराठी अक्षरभारती

**वेळ: 3 तास** **एकूण गुण: 80**

**कृतिपत्रिकेसाठी सूचना: -**

(1) सूचनेनुसार आकलन कृती व व्याकरण यांमधील आकृत्या काढाव्यात.

(2) आकृत्या पेननेच काढाव्यात.

(3) उपयोजित लेखनातील कृतींसाठी (सूचना, निवेदन), आकृतीची आवश्यकता नाही. तसेच, या कृती लिहून घेऊ नयेत.

(4) विभाग 5 – उपयोजित लेखन प्र.5 (अ) (2) सारांशलेखन या घटकासाठी गदय विभागातील प्र.1 (इ) अपठित उतारा वाचून त्या उताऱ्याचा सारांश लिहावयाचा आहे.

(5) स्वच्छता, नीटनेटकेपणा व लेखननियमांनुसार लेखन यांकडे जाणीवपूर्वक लक्ष द्यावे.

### विभाग 1 : गदय

**[18 गुण ]**

**1. (अ) उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा:** **[7]**

**(1) कोण ते लिहा:** **(2)**

(i) आय.आय. टी., कानपूरचा विद्यार्थी - ☐

(ii) स्वच्छतेची आवड असलेली - ☐

अभिषेकनं दार उघडलं आणि कामवाल्या रेखामावशी आत आल्या. आल्या आल्या त्यांनी किचनमधील सिंकमध्ये वाट पाहणाऱ्या भांड्यांकडे आपला मोर्चा वळवला. अभिषेकला आज उठायला उशीरच झाला होता. काल त्यांच्याकडे सुमित आला होता कानपूरहून. सुमित म्हणजे अभिषेकचा आतेभाऊ. तो आय.टी. कानपूरला शिकत होता. काल संध्याकाळी सुमित आल्यापासून गप्पांसोबत सुमितच्या लॅपटॉपवर त्यानं केलेले नवे प्रोजेक्ट अभिषेक पाहत होता. त्यामुळे रात्री झोपायला दोन वाजले. “काय हो हे, तुम्हीच फरशी पुसता आणि तुम्हीच ती घाण करता?” हॉलमधून स्नेहलचा आवाज आला. अभिषेक हॉलमध्ये आला तर रेखामावशी फरशी पुसत होत्या; पण मागे त्यांच्या पायाचे काळे मळकट ठसे पुसलेल्या फरशीवर उमटले होते. स्वच्छतेची भोक्ती असलेली स्नेहल त्यामुळे त्रासली होती. रेखामावशीही बिचाऱ्या वरमल्या होत्या.

“अवो, स्नेहाताई, मी कुठं एसीत बसूनशान काम करत्ये बाई. शेनामातीत काम करावं लागतं! आन आमच्या वस्तीचा रस्ता बी समदा उखणलाय. समदी धूळ लागती पायास्नी. आन धा-धा मिन्टाला हातपाय धोयाला येळ बी नाय आन पानी तरी कुठं हाय बक्कळ?”

**(2) आकृतिबंध पूर्ण करा:** **(2)**

**रेखामावशीच्या पायांना धूळ लागण्याची कारणे**

**(3) स्वमत :** **(3)**

‘तापानं फणफणलीय आपली धरती’ ही स्थिती बदलण्यासाठी उपाय सुचवा.

Target Publications

**(आ) उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा:** **[7]**

**(1) चौकटी पूर्ण करा:** **(2)**

(i) वाघिणीच्या पिल्लांचे वय – ☐

(ii) वाघिणीला अवगत असलेली कला – ☐

साधारणत: कुत्र्यापेक्षा लहान आकाराची ही पाच महिन्यांची वाघिणीची पिल्लं होती. या वयात लहान मुलं जशी खेळकर असतात, तशीच ही खेळकर होती. एकमेकांचा पाठलाग करणं, मारामारी करणं, पाण्यात उड्या घेणं असे खेळ सुरू झाले. मध्येच आई वळून एखाद्या पिल्लाला मायेने चाटत होती. थोडा वेळ बसल्यावर ती पटकन उभी राहिली. डोकं वळवून तिनं हळूच 'ऑऽवऽ' असा आवाज केला. हा पिल्लांना मागं येण्याबद्दलचा इशारा होता. लगेच वळून ती चालायला लागली. हिनं जंगलात कुठंतरी नक्कीच एखादं सांबर, रानगवा, नीलगाय, रानडुकराची शिकार साधली असावी; पण अशी शिकार जड असल्यानं ती उचलून पिल्लापर्यंत आणणं शक्य नसतं. त्यामुळं पिल्लांजवळ येऊन घटकाभर पाण्यात बसून तिनं विश्रांती घेतली होती आणि आता ती पिल्लांना त्या शिकारीकडं घेऊन जात होती. या चार पिल्लांसोबतच स्वत:च पोट भरण्यासाठी तिला सतत कोणती-कोणती शिकार करणं आवश्यकच होतं. त्या कलेत ही चांगली पारंगत होती. वाघिणीनं नाला पार करून बाबूंच्या गंजीत पाय ठेवला. आत शिरण्याआधी तिनं वळून पिल्लं सोबत येताहेत की नाही हे पाहून घेतलं.

**(2) कृती करा :** **(2)**

**वाघिणीच्या पिल्लांचे खेळ**

☐ ☐

**(3) स्वमत:** **(3)**

'लेखकाला वाघिणीतील आईची झलक जाणवली', हे विधान पाठाच्या आधारे स्पष्ट करा.

**अपठित गद्य**

**(इ) उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा:** **[4]**

**(1) कारणे लिहा:** **(2)**

(i) माणसाला श्रेष्ठ कलाकृतींचा आस्वाद घेता आला पाहिजे, कारण .......

(ii) एखादा माणूस साक्षर असूनदेखील सुसंस्कृत नसतो, कारण .......

माणसाला श्रेष्ठ कलाकृतींचा आस्वाद घेता आला पाहिजे कारण श्रेष्ठ कलाकृतींमध्ये जीवन फुलवण्याची अमर्याद शक्ती असते. नाटक पाहणे, पेटीच्या सुरांत रमणे, कुस्त्यांची रणधुमाळी अवलोकणे किंवा क्रिकेटची टेस्ट मॅच पाहण्यात दंग होणे यांतील मौज काही औरच आहे. साहित्य, संगीत, नाट्य, चित्र यांसारख्या कलांनी माणसाच्या जीवनाला समृद्धी आणलेली आहे. मानवाला सुसंस्कृत बनवले आहे. परंतु एखादा माणूस साक्षर असूनही सुसंस्कृत नसतो, कारण जीवनातील आनंद कसा लुटावा हे त्याला ठाऊक नसते. कलेचे रहस्य जाणण्याची दृष्टी त्याला प्राप्त झालेली नसल्याने जीवनातं त्याचे मन कोठेच रमत नाही. माणसाच्या जीवनात विरंगुळा जितका जास्त येईल, तितके त्याचे जीवन अधिक सुखी बनेल.

**(2) आकृतिबंध पूर्ण करा :** **(2)**

**माणसाच्या जीवनात समृद्धी आणणाऱ्या कला**

☐ ☐ ☐ ☐

## विभाग 2 : पदय

[16 गुण]

**2. (अ) कवितेच्या आधारे सूचनेनुसार कृती करा:** [8]

**(1) कोण ते लिहा:** (2)

(i) चंद्रकिरण पिऊन जगणारा पक्षी – ☐

(ii) व्यक्तीला सदैव सुख देणारा – ☐

जेवीं चंद्रकिरण चकोरांसी । पांखोवा जेवीं पिलियांसी।
जीवन जैसे कां जीवांसी । तेवीं सर्वांसी मृदुत्व।।
जळ वरिवरी क्षाळी मळ । योगिया सबाह्य करी निर्मळ।
उदक सुखी करी एक वेळ । योगी सर्वकाळ सुखदाता।।
उदकाचें सुख तें किती । सवेंचि क्षणें तृषितें होती।
योगिया दे स्वानंदतृप्ती । सुखासी विकृती पैं नाही।।
उदकाची जे मधुरता । ते रसनेसीचि तत्त्वतां।
योगियांचे गोडपण पाहतां । होय निववितां सर्वेंद्रियां।।
मेघमुखें अध :पतन । उदकाचें देखोनि जाण।
अध :पातें निवती जन। अन्नदान सकळांसी।।
तैसे योगियासी खालुतें येणें । जे इहलोकीं जन्म पावणें।
जन निववी श्रवणकीर्तनें । निजज्ञानें उदधरी।।

**(2) खालील तक्ता पूर्ण करा :** (2)

**योगी पुरुष आणि पाणी यांतील फरक स्पष्ट करा :**

| योगी पुरुष | पाणी |
|---|---|
| (i) .................................... | (i) .................................... |
| (ii) .................................... | (ii) .................................... |

**(3) प्रस्तुत कवितेतील शब्दांचा अर्थ लिहा:** (2)

(i) पांखोवा – (ii) उदक – (iii) तृषित – (iv) क्षाळणे –

**(4) काव्यसौंदर्य :** (2)

योगी पुरुष आणि पाणी हे दोघेही सामाजिक कार्य करतात, हे स्पष्ट करा.

**(आ) खालील दोन कवितांपैकी कोणत्याही एका कवितेसंबंधी दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे कृती सोडवा.** [8]

| मुद्दे | 'अंकिला मी दास तुझा' किंवा 'स्वप्न करू साकार' | | |
|---|---|---|---|
| (1) प्रस्तुत कवितेचे कवी / कवयित्री- | | | (1) |
| (2) प्रस्तुत कवितेचा विषय- | | | (1) |
| (3) प्रस्तुत ओळींचा सरळ अर्थ लिहा. | नामा म्हणे मेघा जैसा<br>विनवितो चातक जैसा. | हजार आम्ही एकी बळकट<br>सर्वांचे हो एकच मनगट | (2) |
| (4) प्रस्तुत कविता आवडण्याचे वा न आवडण्याचे कारण | | | (2) |
| (5) प्रस्तुत शब्दांचा अर्थ लिहा. | (i) कनवाळू –<br>(ii) काज –<br>(iii) सवे –<br>(iv) पाडस – | (i) विभव –<br>(ii) हस्त –<br>(iii) श्रम –<br>(iv) तन – | (2) |



Target Publications

## विभाग 3 : स्थूलवाचन [6 गुण]

**3. खालीलपैकी कोणत्याही दोन कृती सोडवा.**

(1) टीप लिहा – व्युत्पत्ती कोशाचे कार्य.

(2) पणतीच्या उदाहरणातून ‘जाता अस्ताला’ या कवितेत व्यक्त झालेला विचार स्पष्ट करा.

(3) “आधी केले मग सांगितले’, या उक्तीचा यथार्थता ‘मोठे होत असलेल्या मुलांनो.....’ या पाठाच्या आधारे स्पष्ट करा.

## विभाग 4 : भाषाभ्यास [16 गुण]

**4. (अ) व्याकरण घटकांवर आधारित कृती: [8]**

**(1) खालील वाक्यांचा प्रकार ओळखा: (2)**

(i) पांढरा रंग कोणाला आवडत नाही?

(ii) किती सुंदर आहे ही बाग!

**(2) कंसातील सूचनेनुसार वाक्य रूपांतर करा: (2)**

(i) तू आता लहान राहिला नाहीस. (होकारार्थी करा.)

(ii) दररोज अभ्यास कर. (विधानार्थी करा.)

**(3) खालील वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा: (कोणतेही दोन) (4)**

(i) अंगाचा तिळपापड होणे.

(ii) तथ्य असणे.

(iii) ऋण असणे.

**(आ) भाषिक घटकांवर आधारित कृती: [8]**

**(1) शब्दसंपत्ती:**

**(i) खालील शब्दांचे समानार्थी शब्द लिहा: (1)**

(i) घर (ii) आई

**(ii) खालील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा. (1)**

(i) सोपे × (ii) दिवस ×

**(iii) शब्दसमूहाबद्दल एक शब्द लिहा: (1)**

कविता करणारा ........................

**(iv) खालील शब्दांचे लिंग बदला. (1)**

(i) शिक्षक (ii) विद्यार्थी

**(2) लेखननियमांनुसार लेखन: (2)**

**खालील वाक्ये लेखननियमांनुसार लिहा:**

(i) अशा परिस्थीतीत माझी शाळा सूरू झाली.

(ii) पूलाच्या जवळपास भीक्षेकरी म्हातारा दिसला.

**(3) विरामचिन्हे: (2)**

**खालील विरामचिन्हांची नावे लिहा:**

(i) , (ii) . (iii) ! (iv) ?

## विभाग 5 – उपयोजित लेखन

[24 गुण]

5. (अ) **खालील कृती सोडवा:** (6)

(1) **पत्रलेखन:**

खालील निवेदन वाचा व त्याखालील कोणतीही एक कृती सोडवा. (6)

ज्ञानप्रकाश वाचनालय, सोमवार पेठ, धुळे आयोजित
विद्यार्थ्यांसाठी भाषिक कौशल्यांचा विकास करणारी
**'वाचन कार्यशाळा'**
विशेष मार्गदर्शन – श्रीमती वीणा सप्रे 1 नोव्हेंबर ते 10 नोव्हेंबर
संपर्क- dpv.70@gmail.com

कु. समीर/सानिका घाटे, सन्मित्र विद्यालय, धुळे येथून विद्यार्थी प्रतिनिधी या नात्याने

सन्मित्र विद्यालयाच्या 10 विद्यार्थ्यांना कार्यशाळेत सहभागी करून घेण्याची विनंती करणारे पत्र व्यवस्थापकांना लिहा.

**किंवा**

कार्यशाळेच्या उत्तम आयोजनाबद्दल अभिनंदन करणारे पत्र वाचनालयाच्या व्यवस्थापकांना लिहा.

**किंवा**

(2) **सारांशलेखन**

विभाग - 1 : गद्य (इ) (प्र. क्र. 1- इ) मधील अपठित गद्य उताऱ्याचा 1/3 एवढा सारांश तुमच्या शब्दांत लिहा.

(आ) **खालीलपैकी कोणत्याही दोन कृती सोडवा:** [10]

(1) **जाहिरात लेखन:** (5)

शालेय गणवेशाच्या दुकानाची आकर्षक जाहिरात तयार करा.

(2) **बातमी लेखन:** (5)

'अभिनव विद्यालय', औरंगाबाद येथे दि. ऑक्टोबर रोजी 'वाचन प्रेरणा दिन' संपन्न झाला. वरील कार्यक्रमाची बातमी लिहा.

(3) **कथालेखन:** (5)

खालील मुद्द्यांच्या आधारे कथा लिहा:

**मुद्दे:** राजाची अंगठी चोरीला – सेवकांवर संशय – हुशार प्रधानाची युक्ती – सर्व सेवकांना समान लांबीच्या काठ्या – 'जो चोर त्याची काठी दुसऱ्या दिवशी 2 इंच वाढणार' – दुसऱ्या दिवशी एका सेवकाची काठी 2 इंच कमी – खरा चोर सापडणे.

Target Publications

(इ) **लेखनकौशल्य:**

**खालील लेखनप्रकारांपैकी कोणतीही एक कृती सोडवा:** **[8]**

**(1) प्रसंगलेखन:**

टिळक मंदिर सभागृह

**'भव्य रांगोळी प्रदर्शन'**


| | |
|---|---|
| **विविधरंगी कलात्मक रांगोळ्या** | **तीन सर्वोत्कृष्ट रांगोळ्यांना पारितोषिके** |

**✶ तब्बल 50 स्पर्धक सहभागी**

**वरील प्रसंगी तुम्ही उपस्थित होतात अशी कल्पना करून प्रसंगलेखन करा.**

**(2) आत्मकथन**

**दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे चौकटीतील घटकाचे आत्मकथन लिहा.**




**(3) वैचारिक:**

**'झाडे लावा, पृथ्वी वाचवा' या विषयावर तुमचे विचार लिहा.**

Target Publications